**महाराष्ट्र शासन**
**महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ**
शासकीय तंत्र निकेतन इमारत, 49, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400 051.
दुरध्वनी क्र.26474435, Email : chairman-msbve@nic.in / msbve2003@yahoo.com Web site :- www.msbve.gov.in

जा.क्र .मराव्यशिपमं/का-12/ 1113 /2019
दिनांक : 6/11/2019

# परिपत्रक

**विषय** : मंडळाच्या पदविका अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात थेट प्रवेश देणेबाबत.

**संदर्भ** : 1) मंडळाचे परिपत्रक क्र. मराव्यशिपमं/का-12/ शैक्षणिक विभाग/156/2018, दिनांक 23 फेब्रुवारी 2018
2) मंडळाची दिनांक 11 ऑक्टोबर 2019 रोजी झालेली 53 वी सर्वसाधारण बैठक.

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये आपणास कळविण्यात येते की, मंडळाचे 1 वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मंडळाच्या 2 वर्षीय पदविका अभ्यासक्रमास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून थेट द्वितीय वर्षात प्रवेश देण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे.

1) विद्यार्थी किमान 10 वी उत्तीर्ण असावा.
2) विद्यार्थी महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाच्या 1 वर्षिय प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण असावा.
3) संस्थेने द्यावयाचे हमीपत्र सोबत जोडण्यात येत आहे.
4) विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाकरीता कालमर्यादेची अट रद्द करण्यात येत आहे.
5) एकूण प्रवेश क्षमतेच्या रिक्त असलेल्या जागांवर थेट प्रवेश करण्यात यावेत.
6) 1 वर्ष अभ्यासक्रमाच्या निकालानंतर 15 दिवसात विद्यार्थ्यांचे प्रवेश घेण्यात यावेत.

( एस.के.वायदंडे )
सचिव
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई-51.

प्रति,
सर्व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी

प्रत :-
1) मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य राज्य, मुंबई-1 यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
2) मा.सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
3) परीक्षा विभाग, म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई-51 यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
4) संगणक विभाग, म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई-51 यांना माहिती व वेबसाईटवर प्रदर्शित करण्यासाठी.

मंडळाच्या 2 वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमास थेट प्रवेश देण्याकरीता द्यावयाचे हमीपत्र
( रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर )

या हमीपत्राद्वारे मी -----------------------------------अध्यक्ष / व्यवस्थापक --------------------------------------- संस्था/ आस्थापना नाव -----------------------------------सोसायटीचा / मंडळाचा व्यवस्थापकाचा ठराव करुन अशी हमी देतो की,

1) माझ्या आस्थापनेवर / संस्थेत 02 वर्षे कालावधीचे 1) ------------------- 2) ------------------ 3) --------------- सुरु आहेत.
2) सदरच्या अभ्यासक्रमासाठी श्री / श्रीमती -------------------------------------------------- यांना थेट दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश देण्याकरीता त्यांनी मंडळाच्या अटीनुसार व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचा -------------------- एक वर्षीय कालावधी अभ्यासक्रम ------------------------- साली पूर्ण केला आहे.
3) मंडळाच्या थेट 02 वर्षासाठी पात्र अभ्यासक्रमांच्या यादीनुसार संबंधीत विद्यार्थी -------------------------------- अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश मिळण्यासाठी अर्ज केला आहे.
4) मंडळाच्या सर्व अटींनुसार सदर विद्यार्थी पात्र आहे.
5) सदर विद्यार्थ्याचा प्रथम वर्षाच्या नियमित ट्रेड थेअरी व प्रात्यक्षिक सोबत ( 2 वर्षीय अभ्यासक्रमाच्या) तीन अतिरिक्त विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी या संस्थेची राहील.
6) सदरच्या अभ्यासक्रमासाठी मंजूर प्रवेश क्षेमतेपेक्षा अधिकचे प्रवेश दिले जाणार नाही.
7) शासकीय प्रचलित नियमानुसारच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतील.
8) अभ्यासक्रमांकरीता शासनाच्या प्रचलित नियमात वेळोवेळी जे बदल होतील ते काटेकोरपणे पाळण्याची याद्वारे हमी देण्यात येत आहे.

संस्थाचालकाचे नाव व सही
संस्थेचा/ कार्यालयाचा शिक्का

ठिकाण :-

दिनांक :-